# बीड जिल्ह्याची जबाबदारी मा.खा.प्रीतमताई मुंडे यांची जिल्हाध्यक्षपदावर होणार भरारी!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


## भाजपने मुंडे साहेबांच्या लेकीला देणार जिल्हाध्यक्षपदाची भेट

## जिल्ह्यात ताईंचा दरारा आता जिल्हाध्यक्ष होणार खरा


■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २२९ ■ गुरूवार दि.८ मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 229 ■ Thursday Dt.8 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# बीड जिल्हा भाजपच्या अध्यक्षपदी मा.खा. डॉ प्रीतम मुंडे तर युवा मोर्चा जिल्हाध्यक्षपदी चंद्रकांत फडांची वर्णी लागणार?

■ रमेश आडसकरांनी अजितदादा पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केल्यामुळे बीड जिल्ह्यात चेहरा राहिलेला नाही?

■ आ.सुरेश धस, मा.आ. लक्ष्मण पवार पंकजाताई च्या यादीतून वगळलेले नेते?

## बीड जिल्ह्यात भाजप तळागाळापर्यंत गेलेला पक्ष परंतु काड्या करणाऱ्यांमुळे निष्ठावांतांना मिळेना न्याय, निष्ठावंतांची खंत!

बीड । प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षात खासदार पदाची सूत्रे डॉ.प्रीतम ताई मुंडे यांच्या हाती होते. त्यावेळेस पासून आज पर्यंत पंकजाताई मुंडे यांचा बालेकिल्ला असलेला बीड जिल्ह्यामध्ये स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे बीड जिल्ह्यातील विचार हे प्रीतम ताई यांनी त्यांच्या कानाने ऐकलेले आहेत. तसेच त्या डोळ्याने पाहिलेले आहेत. सर्वसामान्यांची जाण असलेल्या प्रीतम मुंडे यांनी गाव, वाडी वस्ती तांडा बीड जिल्ह्यातील कानाकोपऱ्यावरती गेलेले आहेत. त्यामुळे प्रीतम ताईंची बीड जिल्ह्यामध्ये निवड झाल्यानंतर भाजप पदाधिकारी नव्हे तर बीड जिल्ह्यातील जनता ही खुश होणार आहे. पण निष्ठावांतांना दूर न ठेवता त्यांना जवळ ठेवून चुगली खोड कार्यकर्त्यांना मात्र दूर ठेवणे गरजेचे आहे. प्रीतम मुंडे ह्या खासदार असताना गोरगरिबांच्या सेवेसाठी तत्पर होते. त्यांच्या कार्यकाळ जिल्ह्याच्या विकासासाठी कोट्यावधींचा निधी खर्च करून जिल्ह्याचा विकास करून दाखवला. तसेच त्यांची भरारी राजकीय क्षेत्रात तत्पर आहे.



राजकारणातील वाघीण म्हणून त्यांची ओळख आहे. पक्षांमध्ये देखील त्यांची वेगळी छाप आहे. यामुळे सर्व गोष्टींचा आढावा घेऊन भाजपा ने त्यांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी टाकणार आहे. त्या जबाबदारीनुसार प्रीतम ताई मुंडे ह्या सक्षम काम करतील असा विश्वास जिल्ह्यातील जनतेला आहे. खासदार असताना प्रीतम ताई मुंडे यांनी जिल्हाचा विकास करून दाखवला. केलेला विकास आणि दाखवलेला विश्वास जनता विसरणार नाही. महत्त्वाचे म्हणजे प्रीतम ताई मुंडे यांनी काही बगल बच्चे कार्यकर्त्यांना जवळ करू नये अशी मागणी देखील जनतेतून होत आहे. परंतु निष्ठावंतांना लाभ न करता जवळ धरून गद्दारी करणाऱ्यांना त्या गद्दारीचा धडा शिकवावा अशी मागणी देखील निष्ठावंत कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. एकच पद १५ ते २० वर्षापासून पण मलाच मिळाला पाहिजे, असे अनेक कार्यकर्ते आहेत. परंतु त्यांना जवळ न करता थोडंसं नवीन चेहऱ्यांना आणि निष्ठावंतांना एक संधी द्यावी, नवीन कार्यकर्त्याला ताई साहेबांच्या जवळ जाऊन द्यायचं नाही. असे सहा ते सात जण आहेत की, जे भाजपच्या नेत्यापर्यंत आणि ताईसाहेबांपर्यंत त्या खालच्या कार्यकर्त्याला जाऊन देत नाहीत.
आम्हाला विचारल्याशिवाय ताई साहेबांना फोन करायचा नाही. आणि पक्षाचे काम करायचं नाही त्यामुळे बीड तालुक्यातील भाजप संपलेली आहे. त्यामुळे पंकजाताई मुंडे व प्रीतम ताई मुंडे यांनी आता तरी बीड जिल्ह्यातील विविध आघाड्यांचे पद व बीड जिल्ह्यातील कार्यकारणी घेत असताना नवीन कार्यकर्त्यांना संधी देणे गरजेचे आहे. यामुळे निष्ठावंतांना काम करण्याची एक वेगळी संधी आणि पक्षांमध्ये निष्ठावंत राहणाऱ्यांना प्रीतम ताई मुंडे यांनी पक्षांमध्ये काम करण्याची संधी देण्यात यावी अशी मागणी होत आहे.



## गढी ग्रामपंचायत कार्यालयास ग्रामसेवक नसल्याने ग्रामस्थांची कामे खोळंबली

गढी । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील गढी ग्रामपंचायत ही मोठ्या लोकसंख्येची ग्रामपंचायत असून या गावातील ग्रामसेवक श्री.तुकाराम घोलप हे एक महिन्यापासून आजारी रजेवर गेल्यामुळे त्यांच्या जागी दुसरा ग्रामसेवक नसल्याने ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात कामे खोळंबली असून त्यांच्या जागी अद्याप कुणाकडेही चार्ज देण्यात आलेला नसून चार्ज दिला नाही का कोणी घ्यायला तयार नाही असा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे पडला आहे.

ग्रामपंचायत कार्यालय हे गावातील महत्त्वाचे कार्यालय असून या प्रकरणाकडे मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांचे साफ दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. तरी एक महिन्यापासून ग्रामसेवक नसल्यामुळे गावातील नागरिकांचे विविध प्रकारचे अनुदान,पी टी आर, रहिवासी दाखला, जन्म प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र, नाहरकत प्रमाणपत्र या सह विविध प्रमाणपत्रासाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी येथे लक्ष घालून ग्रामसेवक यांची नियुक्ती करून ग्रामस्थांची होणारी हेळसांड थांबववी अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.




## बीड शहरातील विहिरी, बोअर अधिग्रहण करा : जगताप, मुळूक, गलधर

### शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

बीड । प्रतिनिधी

ऐन उन्हाळ्यात बीडकरांना महिनाभरापासून पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. यामुळे नागरिकांमध्ये नगर पालिकेविरोधात संताप व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत शहरातील खासगी विहिरी, बोअरचे अधिग्रहण करावे व संवेदनशीलतेने बीडचा पाणी प्रश्न सोडवावा,अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. शहरात सध्या जाणवत असलेल्या पाणीप्रश्नावरही शिवसेना जिल्हाप्रमुखांनी जिल्हाधिकाऱ्यांसोबत चर्चा केली.

बीड शहरातील बहुतांश भागात अनेक महिन्यांपासून पंधरा ते वीस दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. मात्र भर उन्हाळ्यात महिनाभरापासून नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून विकतचे पाणी घेण्याची वेळ बीडकरांवर आली आहे. एकतर सध्या उन्हाच्या तीव्रतेने बीडकर हैराण झाले आहेत. त्यात सुरळीत पाणीपुरवठा होत असल्याने नागरिक पुरते वैतागून गेले आहेत. उन्हाने जीवाची लाही लाही होत असताना तीव्र पाणीटंचाईमुळे नागरिकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. अशा परिस्थितीत पाणीटंचाई निवारणासाठी खासगी विहिरींचे अधिग्रहण करणे हा एक महत्त्वाचे उपाय आहे. बीडमध्ये देखील सध्याच्या पाणीटंचाईच्या काळात खासगी विहिरी, बोअर अधिग्रहित करण्याची गरज भासत आहे. शहरातील विहिरी आणि बोअर अधिग्रहण करून पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाने या जलस्त्रोतांची नोंदणी करावी, अधिग्रहित केलेल्या जलस्त्रोतांचा वापर पिण्याच्या पाण्यासाठी करावा, विहिरी, बोअर अधिग्रहण करण्यासाठी बीडसह प्रत्येक तालुक्यातील तहसीलदार, मुख्याधिकारी यांना आदेशित करावे, बीडमध्येही नगर





पान २ वर

# गेवराईत रोजगारासाठी रायगडच्या आलेल्या

# गर्भवती महिलेचा उपचारापूर्वीच दुर्दैवी मृत्यू




गेवराई । प्रतिनिधी
परजिल्ह्यातील गेवराईत रोजगारासाठी आलेल्या एका गर्भवती महिलेचा प्रसूतीपुर्विच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना परवा दुपारी घडली. गौरी हिरामण भोई (वय १९) रा.खोपोली जि.रायगड असे मृत महिलेचे नाव आहे.

सदरील महिला आपल्या पतीसह मागील काही वर्षांपासून गेवराईच्या जिनिंगवर काम मजुरीचे काम करत आहे. गौरी भोई या गर्भवती असल्याने सोमवार (दि.५) रोजी दुपारी अचानक प्रसूती वेदना होऊ लागल्याने त्यांना गेवराईच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आहे. परंतू येथे त्यांच्या प्रसूती वेदना कमी होत नसल्याने डॉक्टर यांनी पुढील उपचारार्थ बीडच्या जिल्हा रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला.मात्र, रुग्णालयात दाखल होण्यापूर्वीच गौरीचा दुर्दैवी मृत्यू झाला. दरम्यान, गौरी भोई यांना जुळे असल्याचे कुटुंबीयांकडून सांगण्यात आले. या घटनेची आरोग्य विभागाकडून दखल घेतली असून याचे अन्वेषण करण्यात येणार आहे. मृत गौरी भोई यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले.

# श्याम कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीचा निकाल लागला शंभर टक्के







बीड । प्रतिनिधी
केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली श्याम कनिष्ठ महाविद्यालयाचा एच एस सी परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. निकालात मुलींनी बाजी मारली. याविषयी सविस्तर माहिती अशी की या महाविद्यालयाची स्थापना शिक्षण महर्षी, कर्मयोगी शामरावजी गदळे गुरुजी यांनी केली तेव्हापासून ते आज तयागत या महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस वाढतच आहे.

संस्थेचे सचिव श्री शरद गदळे यांचे निरनिराळ्या मीटिंगमधील मार्गदर्शन, प्राध्यापकांचे अध्यापन आणि विद्यार्थ्यांची जिद्द आणि मेहनत या सर्वांचा परिपाक आणि परिणाम म्हणजे बारावीचा लागलेला शंभर टक्के निकाल यावर्षी सर्वच परीक्षार्थी उत्तीर्ण झालेले आहेत.

या निकालात मुलींनी बाजी मारली यामध्ये कुमारी शिंदे सृष्टी शरद ९३ टक्के गुण घेऊन प्रथम आलेले आहे. कुमारी नागरगोजे श्वेता रामदास ९२.६७% गुण घेऊन द्वितीय आली आहे. कुमारी आंधळे पायल ज्ञानोबा ९१.३३% गुण घेऊन तृतीय आली तसेच कला शाखेत कुमारी जगताप अर्चना ८२ टक्के गुण घेऊन प्रथम आली, कुमार वाघमारे सागर रवींद्र ८१ टक्के गुण घेऊन द्वितीय आला व ढाकणे सुनील नामदेव याने ७९ टक्के गुण घेऊन तृतीय येण्याचा मान पटकावला आहे.

या व सर्व यशवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव श्री शरद शामराव गदळे, अध्यक्ष डॉक्टर शशिकांत शामराव दहिफळकर, कोषाध्यक्ष डॉक्टर शालिनीताई कराड, प्राचार्या सौ जयश्री शरद गदळे, उपप्राचार्य राजेश गंधगे, शाम विद्यालय व महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व पालक यांनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत अशी माहिती प्रसार माध्यमांना श्री तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी दिली आहे.

# वीज ग्राहकांचे लाखों रुपयांची परळी

# नगर परिषदेच्या माथ्यावर बिले

परळी वैजनाथ । प्रतिनिधी
असाच काहीसा प्रकार महावितरणकडून करण्यात आला आहे. महावितरण उपविभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी काही खाजगी ग्राहकांची लाखो रुपयांची थकबाकी परळी नगर पालिकेच्या माथ्यावर मारली असून याचा थांगपत्ता लागू नये म्हणून खाजगी वीज ग्राहकांची वीज बिलांची नावे सुद्धा नगर परिषदेच्या नावाने केली असल्याची माहिती समोर येत आहे. महावितरण सर्वसामान्य बीज ग्राहकांकडून सक्तीची वसुली करते मात्र धनदांडया वीज ग्राहकांची लाखों रुपयांची थकीत बिले ग्राहक क्रमांक तेच ठेवून बीलावर मात्र नगर परिषद नाव टाकले गेले आहे. यातील मास्टर माईंड कोण याची चर्चा होत आहे. जुने मीटर बंद करून त्या ग्राहकास नवीन मीटर देणे व जुन्या मीटर वरील लाखोली थकबाकी नगर परिषदेच्या नावे करणे हो अफलातून शोध परळी उपविभागी कार्यालयाने लावला आहे या प्रकाराची सखा चौकशी होऊन दोषी अधिकाऱ्यांवर गुन्ह दाखल करावीत अशी मागणी मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे ब्रह्मदेव चाटे यांनी केली आहे.

मुख्याधिकारी काय भूमिका घेणार?

काही वीज ग्राहकांचा जुना मीटर क्रमांकावर नगर परिषदेचे नाव लावले खाजगी ग्राहकांची थकीत बीज बाकी परळी नगर परिषदेच्या नावे टाकल्याने याबाबत मुख्याधिकारी काय भूमिका घेतात याकडे लक्ष लागले असून या प्रकरणाची ते चौकशी करतील का असाही प्रश्न उपस्थित होत आहे. आतापर्यंत असे किती प्रकार झाले याचा तपास केला जावा. सदरील प्रकारामुळेच नगर परिषदेची वीज बिलांची थकबाकी मोठ्या प्रमाणावर राहत असावी अशी शंका निर्माण होत आहे. या प्रकरणात मुख्याधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

परंतु सदरील बिलावर पत्ता मात्र संबंधित बीज शहरातील काही ठराविक धनदांडग्या वीज ग्राहकांचे लाखो रुपयांची थकबाकी नगर परिषद परळीच्या नावावर टाकली जात असून बीज ग्राहकांचे नावे बदलून त्यावर नगर परिषदेचे नाव टाकले जात आहे. हा अनागोंदी प्रकार येथील महावितरण उपविभागीय कार्यालयात झाला आहे यातील दोषींवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. कोणाचे ओझे कोणाच्या खांद्यावर ग्राहकांच्या घराचाच ठेवला आहे व त्या याविक ग्राहकांना नवीन मीटर, नवीन क्रमांक दिला असल्याचे समजते.

# माजी खा. मुंडे यांनी काझी अमान यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबियांचे केले सांत्वन



गेवराई । प्रतिनिधी
गेवराई तालुक्याचे पहिले जेष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला यांच्या निधनाबद्दल बीड जिल्ह्याच्या माजी खासदार तथा भाजपाच्या नेत्या प्रीतमताई गोपीनाथराव मुंडे यांनी बुधवार, दिनांक ७ मे २०२५ रोजी सायंकाळी त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन पत्रकार काझी अमान यांच्यासह काझी कुटुंबीयांचे सांत्वन केले.

मुंडे आणि काझी परिवाराचे जुने ऋणानुबंध असून पत्रकार काझी अमान यांच्या मातोश्रींच्या निधनानंतर महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी काझी साहेबांच्या निवासस्थानी पायी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले होते. काझी अमान यांचे वडील गेवराई तालुक्याचे पहिले ज्येष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला यांच्या निधनाचे वृत्त समजताच राज्याच्या मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांनी शोक संदेश पाठवून दुःख व्यक्त केले होते. आता बुधवार, दिनांक ७ मे २०२५ रोजी सायंकाळी बीड जिल्ह्याच्या माजी खासदार तथा भाजपा नेत्या प्रीतमताई मुंडे यांनी काझी साहेबांच्या निवासस्थानी भेट देऊन पत्रकार काझी अमान यांच्यासह काझी कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी गोपीनाथरावजी मुंडे साहेब आणि काझी हयातुल्ला साहेब यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला.

याप्रसंगी काझी हयातुल्ला यांचे ज्येष्ठ चिरंजीव पत्रकार काझी अमान, द्वितीय चिरंजीव काझी शौकत, कनिष्ठ चिरंजीव काझी शकील, नातू काझी उबेद, काझी समी यांच्यासह भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष प्रकाश काका सुरवसे, भाजपा नेते निमेशनड. ज्ञानेश्वर खाडे, तालुका समन्वयक श्रीकांत सानप, जिल्हा सरचिटणीस देविदास नागरगोजे, भाजपाचे तालुकाध्यक्ष (पश्चिम) ड. उद्धव रासकर, तालुकाध्यक्ष (पूर्व) राजेश पवार, शहराध्यक्ष सचिन दाभाडे, माजी सभापती दीपक सुरवसे, भाजपाचे महामंत्री ड.राहुल राका, अखिल भारतीय जैन संघटनेचे तालुकाध्यक्ष अमर गंगवाल, युवा कार्यकर्ते शेख नवीद, गुलाम दस्तगीर, राजवैभव खाडे, डॉ.शेख इब्राहिम, पप्पू खेडकर, अशोक शिंदे, महादेव धोंडरे, रामचंद्र कोळेकर, गणेश सातपुते, मच्छिंद्र यादव, सुशील भोपळे, राजेंद्र हराळे, रामचंद्र कोळेकर यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी प्रीतमताईंनी काझी परिवारातील महिला सदस्यांची भेट घेऊन त्यांचेही सांत्वन केले.



कर्तव्यदक्ष पोलीस हवालदार गणेश पर्जने यांना वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देताना पोलीस हवालदार विजय गायकवाड, पत्रकार उत्तम ओव्हाळ.

# हृदय व कुपोषीय पुनरुत्थान यावर डॉ. अपर्णा कुलकर्णी यांचे व्याख्यान प्रात्यक्षिक

बीड । प्रतिनिधी
योगेश्वरी संस्था संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी, श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने महिला आत्मभान शिबीरात अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रुग्णालयातील डॉ.अपर्णा कुलकर्णी यांनी 'हृदयाचे कार्य रक्तप्रवाह' या विषयी माहिती देऊन कार्डीयाक अरेस्ट, हृदयाचे काम बंद पडणे, हृदयविकार हे प्रात्यक्षिकाद्वारे स्पष्ट करून सांगितले.

योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक प्रताप पवार यांनी डॉ. अपर्णा कुलकर्णी यांनी दिलेली माहिती अतिशय उपयुक्त असून स्वतःच्या मातोश्रीला याच उपचाराद्वारे शुद्धीवर आणले असे समारोपीय मनोगतात सांगितले. कार्यक्रमाचे संचालन तनुजा जगताप, मयुरी मुंडे यांनी तर आभार ईरा फुलतांबकर यांनी मानले. यावेळी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, संचालक, क्रिडा प्रबोधिनीचे सदस्य, सर्व कर्मचारी, उपस्थित होते.

पान १ वरून...

## बीड शहरातील विहिरी, बोअर अधिग्रहण करा : जगताप, मुळूक, गलधर

पालिकेमार्फत शहरातील पाणी असलेल्या विहिरी, बोअर यांचे अधिग्रहण करुन पाणी टंचाईदूर करण्यासाठी उपाययोजना करावी, शहरातील बंद पडलेले बोअर दुरुस्त करावे, जुन्या विहिरींचा गाळ काढावा अशी मागणी करण्यात आली. शहरात सध्या जाणवत असलेल्या पाणीप्रश्नावरही जगताप, मुळूक, गलधर यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केली. काडीवडगाव येथील पाईपलाईनच्या कामाची नुकतीच पाहणी केली असल्याचे मुळूक यांनी जिल्हाधिकारी जॉन्सन यांना सांगितले. पाईपलाईनच्या चार पैकी तीन लिकेजचे काम पूर्ण झाले असून चौथ्या लिकेजचेही काम लवकर पूर्ण करुन शहराला पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करावा अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

# कृत्रिम प्रज्ञेच्या प्रांगणात : चॅटबॉट

सर्वसामान्यपणे एआयचं तंत्रज्ञान आपल्याशी थेट संपर्क साधत नाही. त्याचं काम शांतपणे, आपल्या नकळत सुरू असतं. एआयचा एक प्रकार मात्र खास माणसाशी संवाद साधण्यासाठी म्हणूनच तयार करण्यात आलेला आहे. ज्याप्रमाणे एखादा माणूस आपल्याशी संवाद साधू शकतो त्याचप्रमाणे एआयचा हा प्रकारही आपल्याशी अगदी माणसासारखा संवाद साधू शकतो. तसंच तो स्वयंचलित म्हणजे 'रोबॉट'सारखा असल्यामुळे त्याच्यामध्ये बोलणं ('चॅट') आणि स्वयंचलन ('रोबॉट') अशा दोन्ही यंत्रणांचं एकत्रीकरण झालेलं असतं. म्हणून याला 'चॅटबॉट' असं म्हणतात.

आपल्याशी लिखित किंवा आवाजी माध्यमातून संवाद साधणं आणि आपल्या प्रश्नांची उत्तरं देणं किंवा आपल्या सूचनांनुसार कृती करणं, हे चॅटबॉटकडून अपेक्षित असलेलं काम असतं. आपला फोन, ॲप, वेबसाइट इथे अहोरात्र सेवेला हजर असलेला हा जणू आपला वैयक्तिक साहाय्यकच असतो. सारांश म्हणजे एआयला संवादकौशल्यांची जोड दिली तर त्यातून साकार होणारी यंत्रणा म्हणजे चॅटबॉट.

या चॅटबॉटची विविध रूपं असली तरी त्यापैकी सगळ्यात ठळक आणि जास्त वापरलं जाणारं रूप म्हणजे ग्राहकसेवेसंबंधीची कामं करणारा चॅटबॉट. आपण खाद्यापदार्थ झोमॅटो किंवा स्विगी यासारख्या ॲपवरून मागवल्यानंतर कधीकधी बराच वेळ झाला तरी हे खाद्यापदार्थ आपल्यापर्यंत पोहोचत नाहीत. अशा वेळी 'मी मागवलेले खाद्यापदार्थ कुठे आहेत?' असा प्रश्न आपण



विचारू शकू, यासाठीची सुविधा आपल्याला या ॲपवर दिसते. आपण तिथे क्लिक केल्यावर तिथे एक चॅटबॉट नावाचं सॉफ्टवेअर सुरू होतं. ते आपल्या यूजर आयडीच्या ओळखीनुसार आपले खाद्यापदार्थ नेमके कुठे आहेत किंवा ते घेऊन येत असलेला माणूस कुठपर्यंत पोहोचला आहे, अशा प्रकारची माहिती शोधतं. त्यानुसार ते आपल्याला ही माहिती देतं.

अशा प्रकारच्या जुजबी स्वरूपाच्या उत्तरानं आपलं समाधान झालं तर ठीकच; अन्यथा आपल्याला ग्राहकसेवा विभागामधल्या कुठल्या माणसाशी बोलण्याची सोय बहुतेक वेळा उपलब्ध करून दिली जाते. स्वाभाविकपणे चॅटबॉटची यंत्रणा सगळ्या कंपन्या आपला ग्राहकसेवेसंबंधीचा खर्च कमी करण्यासाठी आणि अधिकाधिक कामं स्वयंचलनाच्या तत्त्वांवर कमी करून घेण्यासाठी वापरतात.

अनेक कंपन्यांच्या संकेतस्थळांवरही आपल्याला चॅटबॉट आपली वाट बघत असलेले दिसतील. उदाहरणार्थ एखाद्या बॅंकेच्या संकेतस्थळावर जाऊन आपण 'मला एक वर्षाच्या मुदतठेवीसाठीचं व्याज सांगा' असं म्हटलं तर तिथला चॅटबॉट ही माहिती आपल्यासमोर सादर करू शकतो. अर्थातच चॅटबॉटकडे सगळ्या प्रश्नांची उत्तरं असू शकत नाहीत.

खास करून आपला प्रश्न किंवा आपली अडचण जरा किचकट असेल तर चॅटबॉट अजिबातच उपयुक्त ठरू शकत नाही. कित्येकदा तर चॅटबॉटच्या उत्तरांनी आपण पार वैतागूनच जातो. हे संबंधित चॅटबॉट यंत्रणेला पुरेसा 'डेटा' न पुरवल्यामुळेसुद्धा होऊ शकतं. कधीकधी आपण प्रश्न स्पष्टपणे न विचारल्याचाही हा परिणाम असू शकतो. संगणकाला आपण माणसाची नैसर्गिक लवचीक भाषा शिकवण्यासाठी 'नॅचरल लॅंग्वेज प्रॉसेसिंग (एनएलपी)' हे तंत्रज्ञान वापरलेलं असलं तरी त्याच्याही मर्यादा असतातच. साहजिकच अनेकदा चॅटबॉट यंत्रणा ग्राहकसेवेसाठी पुरेशी ठरत तर नाहीच; पण उलट ती ग्राहकांच्या सहनशीलतेची सीमा बघणारी ठरते. यामुळे त्यांचं चॅटबॉट यंत्रणेबद्दल खूप नकारात्मक मत होऊ शकतं आणि ते सहजासहजी बदलणं शक्यही नसतं. साहजिकच कंपन्यांनी पुरेशी तयारी नसताना तकडाफडकी चॅटबॉट यंत्रणा ग्राहकांना उपलब्ध करून देऊ नये. तसंच जोपर्यंत तिच्या दर्जाविषयी पुरेशी खात्री होत नाही तोपर्यंत मानवी ग्राहकसेवेचा पर्याय सुरूच ठेवावा.

चॅटबॉट साधे किंवा जास्त हुशार असू शकतात. साध्या चॅटबॉटमध्ये आपण विचारलेल्या प्रश्नात ठरावीक शब्द असतील तर त्या प्रश्नाचं उत्तर देण्याची क्षमता असते. उदाहरणार्थ आपण अशा चॅटबॉटला 'कामाचे तास' असा प्रश्न विचारला तर त्याचं उत्तर 'सोमवार ते शुक्रवार १० ते ५' असं असू शकतं. जास्त हुशार चॅटबॉटला आपली मानवी भाषा जास्त चांगली समजते. अशा चॅटबॉटला आपण 'तुम्ही बंद कधी असता?' असं विचारलं तर तो याही प्रश्नाचं उत्तर बरोबर देईल. साध्या चॅटबॉटला मात्र कदाचित हा प्रश्नच समजणार नाही. चॅटबॉट हा अर्थातच यांत्रिकी प्रकार असल्यामुळे त्याच्यामध्ये भावना असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही; पण चॅटबॉट माणसांशी संवाद साधत असल्यामुळे त्यानं दिलेली उत्तरं नम्र आणि मैत्रिपूर्ण असावीत अशा प्रकारे त्याची रचना माणसानंच केलेली असते. अलीकडे चॅटबॉटशी संबंधित असलेली यंत्रणा उभी करण्यासाठी अनेक कंपन्यांना मनुष्यबळाची गरज भासते.

# खरीप हंगामासाठी, दर्जेदार बियाणे आणि योग्य दरात खते उपलब्ध करून द्या

## आ.सुरेश धस यांच्या खरीप आढावा बैठकीत सूचना

आष्टी | प्रतिनिधी

यावर्षी समाधानकारक पाऊस पडणार असल्याचे सांगितले जात असल्यामुळे पुरेसा पाऊस झाल्यानंतर शेतकऱ्यांना पेरणीसाठी दर्जेदार बी बियाणे आणि योग्य दरात खते उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने नियमांचे काटकर होणे पालन करावे बँकांनी शेतकऱ्यांना पीक कर्ज वेळेत वाटप करावे कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी सूक्ष्म नियोजन करावे. शेतकऱ्यांपर्यंतच्या बांधावर पोचून त्यांना मार्गदर्शन करावे असे सूचना आमदार सुरेश धस यांनी तालिकास्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीमध्ये सर्व खातेप्रमुखांना दिल्या आहेत.

या आढावा बैठकीसाठी पाटोदा उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, आष्टी तहसीलदार वैशाली पाटील, कृषी अधिकारी सुभाष साळवे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, आष्टी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, पाटोदा तालुका कृषी अधिकारी राजेंद्र नेटके, शिरूर कृषी अधिकारी पवार आष्टीचे नगराध्यक्ष जिया बेग उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, मतदार संघातील आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) या तीन ही तालुक्यासाठी बियाणे उपलब्ध व्हावेत म्हणून आष्टी बफर स्टॉक (रॅक पॉईट) करण्यासाठी आपण वरिष्ठांशी चर्चा करणार असून, खरीप हंगामात शेतकऱ्यांना वेळेत व माफक दरात दर्जेदार खते, बी-बियाणे मिळतील याची खात्री करा, यासाठी वेळोवेळी निविष्ठांची तपासणी करा असे सांगत आ.सुरेश धस म्हणाले, ऊस, ज्वारी, सोयाबीन, भुईमूग व कडधान्य पिकांसाठी खरीप हंगामात पाऊस चांगला होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे; परंतु पाऊस कमी झाला तरीही उत्पादन वाढीसाठी सूक्ष्म नियोजन करा. मतदारसंघातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक ते सहकार्य करा. २०२५-२६ मध्ये पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करा. मतदार संघातील शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व योजनांची माहिती देऊन शासकीय योजनांचा लाभ, विमा सुरक्षा मिळवून द्या. तसेच पीक कर्ज मुदतीत वितरित करा. स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेसह शेतकऱ्यांशी संबंधित सर्व प्रलंबित प्रकरणे तत्काळ निकाली काढा. शेतकऱ्यांना विम्याची रक्कम व कर्जवाटप मुदतीत करा. शेतकऱ्यांना मशागत व पेरणी पूर्व मार्गदर्शन करा. क्षारपड जमिनीत सुधारणा होण्यासाठी तसेच या जमिनीची उपयुक्तता वाढविण्यासाठी



उपाययोजनांवर भर द्या. मतदारसंघातील रेशीम उत्पादकता वाढविण्यासाठी सूक्ष्म नियोजन करून त्यानुसार अंमलबजावणी करा.'

आष्टी पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील लागवडी लायक हेक्टरी क्षेत्र, आणि त्या क्षेत्रामध्ये पिकांनुसार लागवड योग्य क्षेत्र व त्या प्रमाणात उपलब्ध होणारे खत व बियाणे यांच्या बाबतचा तुटवडा तसेच आष्टी पाटोदा व शिरूर तालुक्यासाठी खत व बियाणांसाठी महामंडळाचा असणारा रॅक पॉइंट हा परळी या ठिकाणी असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर आष्टी पाटोदा व शिरूर तालुक्याला खतांचा दरवर्षी तुटवडा जाणवतो त्यामुळे याबाबत संबंधितांशी बोलून आष्टी मतदार संघासाठी आष्टी येथे नवीन रॅक पॉईंट मिळवण्यासाठी योग्य पाठपुरावा करण्याबाबत चर्चा झाली आहे तसेच बीज प्रक्रिये बाबत शेतकऱ्यांना कृषी सहाय्यक अधिकारी यांच्याकडून योग्य ती माहिती व त्यासाठी लागणारे औषधे उपलब्ध होत नाहीत व कृषी सहाय्यकांकडून प्रात्यक्षिक दिले न गेल्यामुळे अनेक शेतकरी कुठलीही बीज प्रक्रिया न करता आपल्या बियाणांची शेतामध्ये पेरणी अथवा लावणी करतात तसेच शिरूर कासार तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावरती तूर आणि कापूस हे प्रमुख पीक घेतले जाते परंतु एकाच कंपनीचे बियाणे कृषी विक्रेत्यांच्याकडून वारंवार शेतकऱ्यांना दिले जाते त्यामुळे कापूस व तूर या पिकाची दरवर्षी मिळणारे सरासरी यामध्ये तफावत येत आहे. त्यामुळे कृषी विक्रेत्यांना विनंती आहे की वेगवेगळ्या प्रजातीच्या बियाणांची आपण शेतकऱ्यांना माहिती देऊन ते लागवड करण्यासाठी व पेरणीसाठी प्रोत्साहित करावे.

### कृषी सहाय्यक यांनी बांधावर जावे

शेतकऱ्यांना कृषी योजनेची माहिती देण्यासाठी दुपारी ११ वा. नाही तर सकाळी ७-८ वा.जाऊन माहिती देणे गरजेचे असताना हे कृषी सहाय्यक वेळेचे बंधन ठेवत नाहीत. अशा कृषी सहाय्यक, कृषी मंडळ अधिकारी यांच्यावर तालुका कृषी अधिकारी यांनी ठेवणे गरजेचे आहे. पण आता यावर जर कुणाचा वचक राहिलेला नाही. परंतु जर कुणी कामात हलगर्जीपणा केला तर कुणाचीही गय केली जाणार नाही. कृषी सहाय्यक यांनी बांधावरच जावे अशी सूचना आ. सुरेश धस यांनी दिल्या.

आष्टी विधानसभा मतदारसंघामध्ये मोठ्या प्रमाणावर खते व बियाणांचे लिंकिंग स्वरूपात विक्री सुरू आहे उदाहरणार्थ ज्या शेतकऱ्यांना युरिया घ्यायचा आहे त्या शेतकऱ्यांना नॅनो युरियाची बॅग घेणेबाबत सक्ती होत आहे. एका खताच्या कंपनीबरोबर दुसऱ्या कंपनीचे खत घेणे बंधनकारक केले जात आहे ही बाब गंभीर आहे. त्यामुळे सर्व कृषी सेवा केंद्र यांना विनंती आहे की शेतकऱ्यांची अडवणूक करू नका. यासह खरीप हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांच्या बाबतीत पडणारी कीटकनाशके रोगराई व त्याबाबत फवारणी करण्यासंदर्भातील बायो ऑरगॅनिक औषधे याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जावा रासायनिक औषधांचा व केमिकल युक्त औषध व फवारणी साठी लागणाऱ्या पावडर ह्या कमी प्रमाणात वापरल्या जाव्यात. यासाठी कृषी विभाग व त्या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी शेतकऱ्यांना जागृत करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

यावेळी बियाणे उगवणक्षमता व बीजप्रक्रिया याबाबत प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. शेतीमधील उत्पादन खर्च कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी घरचं बियाणे उगवण क्षमता तपासून पेरणीसाठी वापरावे तसेच बियाण्याला रासायनिक किंवा जैविक कीटकनाशके, बुरशीनाशके व जैविक घटकांची बीजप्रक्रिया केल्याने उगवण क्षमता चांगली होते तसेच रोपावस्थेतील कीड व रोगांचे प्रमाण कमी होते. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी असे आवाहन मा. आ. सुरेश धस यांनी शेवटी केले.

# लिंबागणेश येथे ऑपरेशन सिंदूर विजयाचा जल्लोष; भारतीय सेना, भारत सरकारचे अभिनंदन : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश | प्रतिनिधी

२२ एप्रिल जम्मू कश्मीर येथील पहलगाम या ठिकाणी पाक धार देण्यात दहशतवाद्यांनी २६ निष्पाप भारतीय पर्यटकांचे निर्गुण पणे हत्या केली होती. पहलगाम हल्ल्यातील पीडितांना न्याय देण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय सैन्य दलांनी लढाऊ विमाने आणि ड्रोनद्वारे क्षेपणास्त्राचे हल्ले करण्यात आले.या कारवाईत जैश -ए-मोहम्मद, लष्कर -ए-तोयबा, हिजबुल मुजाहिदीन या दहशतवादी संघटनांची युवकांची भरती, त्यांचे प्रशिक्षण, दहशतवाद्यांना भारतामध्ये घुसवण्यासाठी लॉन्चिंग पॅडम्हणून वापरात येत असलेल्या काश्मीरमधील ५ आणि पाकिस्तान



मधील ४ अशा एकुण ९ तळ जे गेल्या ३ दशकांपासून भारत विरोधी दहशतवादी कारवायांचे केंद्र राहिलेले आहेत.

याठिकाणी हल्ले करून दहशतवादी अड्डे उद्धवस्त करून पहलगाम येथील हल्ल्याचा बदला घेतला आहे. दहशतवादी अड्डे उद्धवस्त करणाऱ्या ऑपरेशन सिंदूर अंतर्गत कारवाई केलेल्या भारतीय सेना आणि भारतीय सरकारचा आम्हाला सार्थ अभिमान असुन आम्ही एकजुटीने पाठिशी असुन भारतीय परंपरेत कुंकु हे सौभाग्याचं लेणं मानलं जाते.पहलगाम हल्ल्यात काही नवविवाहित युवकांनी जीव गमावला. त्यांच्या विधवा पत्नींचे शोकाकुल चेहरे पाहून संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली होती. त्यामुळे ऑपरेशन सिंदूर मोहिमेची माहिती जगाला देणाऱ्या दोन रणरागिनी भारत सरकारने पत्रकार परिषदेत माहिती दिली. यावेळी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांच्यासह लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि वायुदलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंग याची माहिती देण्यासाठी निवड करत भारताच्या लेकी अतिरेक्यांना ठोस प्रतिउत्तर देऊ शकतात हा संदेश देण्यात आला. आज दि.८ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील मुख्य प्रवेशद्वारावर भारतीय सैन्य आणि भारत सरकारचे अभिनंदन करत भारत माता की जय, जय हिंद, भारतीय सेना जिंदाबाद, वंदे मातरम आदी घोषणाबाजी करत आतषबाजी करत विजयोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी डॉ.गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, माजी सरपंच कल्याण वाणी, विक्रांत वाणी, भगवान मोरे, दामोदर थोरात, विक्रम दाभाडे, गणपत तागड, संतोष भोसले, सुदाम मुळे, अँड.गणेश वाणी, संजय घोलप, पांडुरंग वाणी, दादा गायकवाड, राजेभाऊ ढास, संजय सुकाळे, नितीन जाधव, शिवाजी शिंदे, शिवाजी रणखांब, बाजीराव दशमे, हरिओम क्षीरसागर आणि राम फाळके उपस्थित होते.

# लोकशाही पत्रकार महाराष्ट्र राज्यच्या जालना जिल्हा अध्यक्षपदी अंकुशराव बोबडे

जालना | प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार संघांच्या जालना जिल्हा अध्यक्ष पदी अंकुशराव बोबडे यांची निवड करण्यात आली. ही निवड संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण, आयेशाखान मुलानी, निलोफर शेख प्रदेश अध्यक्ष उत्तर महाराष्ट्र, प्रदेश अध्यक्ष उद्योग विकास समिती मनीषा धिरडे, प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद, साजेद सय्यद, अनिस कुरेशी यांच्या आदेशानुसार कैलासराव वाडकर-उपजिल्हाध्यक्ष, रामेश्वर तांगडे-दैनिक युवती राज जिल्हा जालना, उपसंपादक तथा सचिव-ता.घनसावंगी कुरेशी मुकीब, लोकशाही पत्रकार संघ, तालुका अध्यक्ष यांनी निवड करून जाहिरा सत्कार करण्यात आला.



नवनिर्वाचित राजकारण विकास समितीचे जालना जिल्हा अध्यक्ष अंकुशराव बोबडे म्हणाले की, जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यात लोकशाही पत्रकार संघ संलग्न विकास समिती च्या कार्यकारणी लवकरच तयार करण्यात येतील. या समिती मार्फत लोकांचे सामाजिक, आर्थिक, वयक्तिक, शासकीय योजनाची कामे केळी जातील. यावेळी भास्करराव पांढरे, रमेशराव शिंदे, विष्णुपंत गाडेकर, गणेशराव गुजर, महादेव मोहिते, संदीप काळे, मुखीत खान, अमोल काळे, आदी उपस्थित होते. संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ, राष्ट्रीय निरीक्षक डॉ. भोळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंत्रालय कामकाज दत्तात्रय हंडीबाग, राष्ट्रीय सचिव छाया वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष महिला बचत गट, उद्योग विकास समिती सुनंदा केदार, प्रदेश अध्यक्ष मनीषा धिरडे - उद्योग विकास समिती, मराठवाडा उपाध्यक्ष दत्ता भाऊ नरनाळे यांच्या मार्गदर्शनानुसार लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य, संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती मनमोहन तोमर नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष, पांडुरंग साळुंके पुणे जिल्हा अध्यक्ष, प्रदेश उपाध्यक्ष सरपंच ग्रामपंचायत विकास समिती सखाराम पोहीकर, मराठवाडा उपाध्याक्ष बाळासाहेब फपाळ, नांदेड जिल्हा सचिव बाजीराव गायकवाड, शिवराज बिराजदार सोलापूर शहर उपाध्यक्ष, नवी मुंबई सरचिटणीस बालाजी सूर्यवंशी, लक्ष्मण भोसले - सोलापूर शहर सचिव, जस्मित तोमर - नवी मुंबई महिला आघाडी, प्रदेश उपाध्यक्ष संध्या भोसले, प्रदेश उपाध्यक्ष महिला बचत गट उद्योग विकास समिती सारिका शेवाळे, प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती श्रद्धा कंडूडे, मराठवाडा युवक अध्यक्ष दिपक भाऊ थोरात, प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे पाटील, प्रदेश सचिव राणीताई शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख बिलाल, आत्माराम वाव्हाळ यांनी पुढील कार्यास मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

# अभ्यासात चमकली प्रियंका काकडे हिचे प्रथम क्रमांक घेऊन बारावीच्या परीक्षेत यश

पाटोदा | प्रतिनिधी

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, शेतात आई-वडिलांना मदत करत आणि अभ्यासात सातत्य राखत जानपीर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नाळवंडी कारेगाव येथील कु. प्रियंका प्रकाश काकडे हिने बारावीच्या परीक्षेत ८८.३३ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिचे हे यश खरोखरच प्रेरणादायी आहे. प्रियंका ही शेतकरी कुटुंबातील असून, वडील शेतात कष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. शाळा आणि अभ्यासाच्या वेळेशिवाय प्रियंका नियमितपणे शेतकामात हातभार लावत होती. मात्र, या साऱ्या जबाबदाऱ्या पार पाडून तिने अभ्यासातही उत्कृष्ट कामगिरी केली आहे.



शाळेचे मुख्याध्यापक म्हणाले, प्रियंका हिचे यश मेहनतीचा आणि चिकाटीचा उत्तम नमुना आहे. ती खरोखरच इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरली आहे. प्रियंका भविष्यात सामाजिक शास्त्राच्या माध्यमातून उच्च शिक्षण घेऊन समाजसेवेची दिशा घेण्याचे स्वप्न पाहते. तिच्या या यशामुळे गावकरी, शाळेतील शिक्षक, पालकांत आनंदाचे वातावरण असून, सर्वत्र तिच्या कौतुकाचा वर्षाव होत असुन बीड जिल्हा अनुलोमच्या वतीने तिचे विशेष अभिनंदन करण्यात आले.

# सोनाली रणदिवे हिला वैद्यकीय क्षेत्रातील बीडीएस पदवी प्रदान

धारूर | प्रतिनिधी

धारूर शहरातील आदर्श शिक्षिका जयश्री रणदिवे व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर रणदिवे यांची कन्या कुमारी सोनाली रणदिवे हिला वैद्यकीय क्षेत्रातील बीडीएस (दंत रोग चिकित्सक) ही पदवी मान्यवरांच्या उपस्थिती डीन यांच्या हस्ते छत्रपती संभाजी नगर येथे प्रदान करण्यात आली आहे.

धारूर शहरातील आदर्श शिक्षक सिद्धेश्वर रणदिवे व आदर्श शिक्षिका जयश्री रणदिवे यांची कन्या कु सोनाली रणदिवे सुरुवातीपासूनच हुशार आहे. तिचे प्राथमिक शिक्षण जनता प्राथमिक विद्यालयात, माध्यमिक शिक्षण जनता माध्यमिक विद्यालय मध्ये पूर्ण झाले महाविद्यालइन शिक्षण धारूर येथील जिजाऊ महाविद्यालयामध्ये पूर्ण झाले. वैद्यकीय शिक्षण छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था डेंटल कॉलेज व हॉस्पिटल छत्रपती संभाजी नगर येथे पूर्ण झाले नुकतेच २ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या पदवी प्रदान समारंभात मान्यवरांच्या हस्ते तिला बीडीएस ही पदवी कुंबीयां समवेत प्रदान करण्यात आली.

पदवी समारंभ प्रसंगी कु सोनालीचे वडील सिद्धेश्वर रणदिवे, जयश्री रणदिवे, भाऊ सुरज रणदिवे यांच्यासह कुंबीय उपस्थित होते. तिच्या यशाबद्दल जनता प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विश्वा शिंगारे माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सीमा गायकवाड, आदर्श शिक्षक नाथा ढगे इत्यादींनी अभिनंदन करून कौतुक केले आहे.



## सर्वोच्च न्यायालयाचा आरक्षण उपवर्गीकरण हा ऐतिहासिक निर्णय

# गोपले साहेबांच्या आंदोलनाचे आणि कार्याचे फलित : साळवे

बीड | प्रतिनिधी

पिढ्यानिढ्या संविधानिक आरक्षणाच्या लाभापासून वंचित असणाऱ्या उपेक्षित जातींना आरक्षण वर्गीकरणाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने समान संधीच्या आरक्षणाचा लाभ मिळावा याकरिता दिवंगत बाबसाहेब गोपले साहेबांनी महाराष्ट्रात आरक्षण वर्गीकरण लढ्याची चळवळ उभी केली. परिणामी १ ऑगस्ट २०२४ रोजी माननीय सर्वोच्च न्यायालयाने देशातील अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणा अंतर्गत आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्या संदर्भात ऐतिहासिक निकाल दिला हा निर्णय गोपले साहेबांच्या आंदोलन आणि लढ्याचे फलित आहे.असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते आत्माराम साळवे यांनी केले.

दिनांक ७ रोजी परतूर येथील सरस्वती फाऊंडेशनच्या कार्यालयात दिंवगत



बाबसाहेब गोपले साहेबांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते आत्माराम साळवे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. पुढे बोलतांना साळवे म्हंटले की, महाराष्ट्र राज्यातील दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत असलेल्या मातंग आणि तत्सम समाजातील जीवनमान उंचावणे, समाज प्रवाहात त्यांना मानाचे स्थान मिळण्याच्या उद्देशाने त्यांचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकास होण्यासाठी मदत व्हावी म्हणून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या स्थापनेत आणि मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी गोपले साहेबांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. गोपले साहेबांच्या कार्यामुळे समाजाला एक नवीन ओळख मिळाली.

साहेबांनी मातंग समाजाला स्वाभिमानाने जगण्यासाठी कार्य केले एक नवी दिशा समाजाला मिळाली असे मत यावेळी साळवे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी रनबावळे एस.डी.आनंद गजभारे, सुनील कांबळे, आदित्य गजभारे, उदय रनबावळे, योगेश हिवाळे यांची उपस्थिती होती.



खरकट वाडी तालुका आष्टी येथील अखंड हरिनाम सप्ताहाचे कालेच किर्तन करतांना ह भ प काशीनाथ महाराज व उपस्थित भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छायाचित्र सुरेश कांबळे आष्टी.)

# मुख्यमंत्री साहेब, महायुतीच्या सरकारच्या काळात गोमातेची हत्या करणाऱ्यांवर मकोका लावाच

## एसपी नवनीत कॉवत साहेब, गाईंची हत्या करणाऱ्यांचे कातडे सोलुन काढा

- गेवराई शहरात गोवंश हत्येचे रॅकेट उघड; दोघांना अटक
- शहरात दिवसा ढवळ्या गोहत्या नालीतून कत्तल केलेले रक्त वाहू लागले?
- जनावरांची कत्तल करून मांस विक्री; पोलिसांची छापा टाकत दमदार कारवाई



बीड । प्रतिनिधी

गेवराई शहरातील निकम गल्ली खुरेशी मोहल्ला येथे गोमांस विक्री करणाऱ्या दोन जणांवर काल बुधवार दि.०७ रोजी सकाळी बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहे. शासनाने बंदी घातलेल्या गोवंश जातीच्या जनावरांचे कत्तल करून मास विक्री करत असल्याची माहिती बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने काल बुधवारी रोजी सकाळी मिळालेल्या माहितीनुसार छापा टाकला. या कारवाईत



पोलिसांनी मास कापण्यासाठी वापरले जाणारे दोन लोखंडी सतुर (चाकु) सह अंदाजे किंमत ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पथक खाजगी वाहनाने अवैध धंद्यावर कारवाई करण्यासाठी पेट्रोलिंग करत असताना त्यांना एका गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की, शहरातील निकम गल्ली कुरेशी मोहल्ला येथे प्रतिबंधित गोवंश प्राणी कापून त्याची चोटी मास विक्री केली जात आहे. त्या माहितीनुसार पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी जाऊन छापा टाकला असता त्या ठिकाणी दोन इसम प्रतिबंधित गोवंश मासांचे तुकडे करताना आढळून आले. त्यांच्या बाजूस तीन ते चार गाईचे मुंडके तोडून ठेवलेले होते. व त्या शेजारी त्यांच्या मासाचे विविध तुकडे केलेले होते. सदरील दोन्ही इसमांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव १) गफ्फार इस्माईल कुरेशी (वय ४५, रा. खुरेशी मोहल्ला निकम गल्ली) २) समजलावली कुरेशी (वय ३९, रा. खुरेशी मोहल्ला निकम गल्ली) असे सांगितले. त्यांच्या जवळीत मासाचा जप्ती पंचनामा स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक तुळशीराम जगताप यांनी करून ते मास जप्त करण्यात आले आहे. तसेच पोलीस उपनिरीक्षक तुळशीराम जगताप यांच्या फिर्यादीवरून दोघाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शिवाजीराव दादा पंडित यांनी घेतले श्री क्षेत्र भगवानगडाचे आशीर्वाद

### गडावर सुरु असलेले माऊली मंदिराचे भव्य बांधकाम पाहून व्यक्त केले समाधान

भगवानगड । प्रतिनिधी

माजी मंत्री तथा बीड जिल्ह्यातील शिक्षण महर्षी म्हणून ओळख असलेले शिवाजीराव दादा पंडित यांनी वैशाख शुद्ध मोहिनी एकादशी निमित्त श्री क्षेत्र भगवानगडाचे आशीर्वाद घेतले. यावेळी भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी शिवाजीराव दादांना गडावर सुरू असलेल्या भव्य दिव्य श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या मंदिराची माहिती दिली.

श्री क्षेत्र भगवानगडावर महाराष्ट्रातील एकमेव असे तीन बाय तीन फूट दगडांमध्ये श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिराचे बांधकाम सुरू आहे. आळंदी नंतर श्री क्षेत्र भगवानगडावरच एवढे भव्य मंदिर सुरू आहे. वारकरी संप्रदायातील व संपूर्ण भारतातील वारकरी संप्रदायाचे पाईक भगवानगडावरील माऊलींच्या मंदिराची पाहणी करण्यासाठी येत आहेत. वैशाख शुद्ध मोहिनी एकादशी निमित्त लाखो भाविकांनी गडावर येऊन गडावरील विजयी पांडुरंगाचे दर्शन घेऊन ह.भ.प.वै.श्रीगुरु ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा, वै. गुरुवर्य श्री संत भीमसिंह महाराज, विद्यमान मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांचे आशीर्वाद घेतले. गडावर दिवसभर आलेल्या लाखो भाविकांनी दर्शनानंतर नित्य सुरु असलेला बाबांचा प्रसाद ग्रहण केला. भगवानगडाच्या एकूणच लाखो भाविकांपैकी गेवराईचे पंडित घराणे हे भगवानगडाचे एक निस्सीम भक्त आहेत. घरात परंपरा असल्यामुळे हा परिवार नेहमीच भगवानगडावर येऊन आशीर्वाद घेतो. वैशाख शुद्ध एकादशी निमित्ताने माजी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे शिक्षण महर्षी शिवाजीराव दादा पंडित हे दर्शनासाठी गुरुवारी श्री क्षेत्र भगवानगडावर आले होते. श्री संत भगवानबाबांच्या समाधीचे दर्शन झाल्यानंतर दादांनी श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांचे आशीर्वाद घेतले. यावेळी शास्त्रीजींनी सोबत येऊन शिवाजीराव दादांना गडावर सुरू




असलेले माऊली मंदिराचे भव्य बांधकाम दाखवले. मंदिराबद्दल सर्व माहिती दिली. पुढे शास्त्रीजी म्हणाले की, श्री संत भगवानबाबांनी आयुष्यभर पाण्यावर बसून ज्ञानेश्वरी वाचली. आज त्याच गडावर सुरू असलेले ज्ञानेश्वरी विद्यापीठ आणि त्या विद्यापीठातून संपूर्ण ज्ञानेश्वरी पाठांतरासह ज्ञानेश्वरीचा सखोल अभ्यास करून शेकडो विद्यार्थी आज राज्यभर वारकरी संप्रदायाच्या प्रचार आणि प्रचार करत आहेत. गडावर आठवीपासून प्रवेश दिला जातो. शालेय व महाविद्यालयीन शिक्षणानंतर गोरगरिबांच्या लेकरांना आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे अनेकांना पुणे, मुंबई सारख्या शहरांमध्ये राहून पुढचे शिक्षण घेणे शक्य होत नाही. गोरगरीबांच्या लेकरांच्या शिक्षणाची हीच अडचण समजून घेत भगवानगडाने गडावर विनामूल्य एमपीएससी यूपीएससीचे शिक्षण देणे सुरू केले. आज या स्पर्धा परीक्षा केंद्रातून अनेक विद्यार्थी अधिकारी होऊन बाहेर पडत आहेत. भगवानगडाचे एवढे भव्य दिव्य स्वरूप पाहून माजी मंत्री शिवाजीराव दादांनी मनोमन समाधान व्यक्त केले.

## पाण्याच्या टंचाईत आमेर इनामदारचा मोलाचा पुढाकार

बीड । प्रतिनिधी

शहरात कडक उन्हाळ्यामुळे निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर बीड नगरपरिषदेकडून २५ दिवसांपासून नळांना



पाणीपुरवठा न झाल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पिण्याचे आणि वापराचे पाणी मिळवण्यासाठी नागरिकांना दररोज भटकंती करावी लागत असून प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे जनतेत तीव्र असंतोष पसरलेला आहे.अशा परिस्थितीत प्रभाग क्रमांक २१ मधील मोहमदिया कॉलनीत आमेर इनामदार या सामान्य युवकाने एक प्रेरणादायी पाऊल उचलले आहे. गेल्या दोन दिवसांपासून त्यांनी स्वखर्चाने टँकरच्या माध्यमातून विविध गल्ल्यांमध्ये फिरत नागरिकांना पाणीपुरवठा सुरू केला आहे. नगरसेवकही अपयशी ठरत असताना आमेर इनामदार आपल्या प्रयत्नांत सातत्य ठेवत आहेत. गेल्या दोन दिवसांपासून मोहमदिया कॉलनीतील प्रत्येक गल्लीबोळात टँकरमधून पाणी वाटप करत नागरिकांना दिलासा देणारे इनामदार हे नागरिकांच्या आशेचा किरण ठरले आहेत. त्याच्या या निस्वार्थ सेवेमुळे परिसरातील नागरिक समाधान व्यक्त करत असून त्यांच्यावर आशीर्वादांचा वर्षाव करत आहेत.शासन आणि प्रशासनाने यापासून प्रेरणा घेत तातडीने ठोस पावले उचलावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

## नीट परीक्षेत बीडमध्ये मानधन घोटाळा; चौकशी करून कारवाई करण्याची मागणी

### एका शाळेतील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापकाने पर्यवेक्षकांच्या मानधनावर मारला डल्ला


बीड । प्रतिनिधी

शहरात नीट परीक्षेचे परीक्षा केंद्र असलेल्या एका शाळेत पर्यवेक्षकांच्या मानधनात घोटाळा झाल्याची उघड चर्चा जिल्हाभरात होत असून एका शाळेतील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापकाने संगणमत करून पर्यवेक्षकांसाठी येणाऱ्या मानधनावर डल्ला मारल्याची चर्चा जोरात होत आहे. या संबंधी जिल्हा प्रशासनाने चौकशी करून दोषी मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापकांवर कडक कारवाई करण्याची मागणी होऊ लागली आहे, अशी माहिती मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिली आहे.



याविषयी थोडक्यात वृत्त असे की, नुकतेच दिनांक ४ मे २०२५ रोजी नीट ची परीक्षा पार पडली. या परीक्षेचे केंद्र इतर शाळांप्रमाणे बीड शहरातील एका शाळेतही होते. त्या शाळेतही या परीक्षेसाठी पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांना देण्यात येणारे मानधन हे प्रत्येकी २ हजार रुपये होते. हे मानधन त्या शिक्षकांना पूर्ण मिळणे अपेक्षित असताना त्या शाळेतील मुख्याध्यापक आणि उपमुख्याध्यापकांनी संगणमत करून पर्यवेक्षक असलेल्या शिक्षकांना प्रत्येकी हजार रुपयेच दिले. बाकीच्या रकमेवर संगणमत करून डल्ला मारला. या बाबीला पर्यवेक्षक असलेल्या काही शिक्षकांनी विरोध केला असता अशा शिक्षकांना बोलावून त्यांना गुपचूपपणे उरलेले एक-एक हजार रुपये दिले मात्र बाकीच्या शिक्षकांची एक हजार रुपयांवरच बोळवण करण्यात आली. सदरील मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक गेल्या अनेक वर्षांपासून अशा प्रकारे पर्यवेक्षकांच्या मानधनात मोठ्या प्रमाणात घोटाळा करत असल्याचेही चर्चिले जात आहे. यामुळे ही बाब पाहता शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात चर्चा होऊ लागली आहे. याची शिक्षण विभागासह जिल्हा प्रशासनाने सखोल चौकशी करून दोषी मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी होऊ लागल्याची माहिती मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिली आहे.

## बीड जिल्हा पोलीस पथसंस्था अध्यक्षपदी दुबाले, सचिवपदी परळकर याची निवड



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस दलातील उल्लेखनीय कार्यामगिरीसाठी नावाजलेली पोलीस कर्मचारी यांची बीड जिल्हा पोलीस दलाच्या जिल्हा पोलीस पथसंस्था निवडणूक २०२५ बिनविरोध करण्यात आली यात यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव सह सर्व समितीचे सर्वांकडून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला बीड जिल्हा पोलीस दलातील पतसंस्था निवडणुकी बिनविरोध झाली.

संबंधित पतसंस्थेची कार्यकारणी खालील प्रमाणे. अशोक दुबाले (अध्यक्ष), संघर्ष गोरे (उपाध्यक्ष), ज्ञानेश्वर परळकर (सचिव), संचालक मंडळ मनोज जोगदंड, मनोज वाघ, नितीन साळवे, सचिन जायभाय, संतोष म्हेत्रे, शहेंशा सय्यद, रेखा गोरे, रंजना सांगळे यांची सर्वानुमते २०२५ ते २०३० साठी बिनविरोध निवड करण्यात आली.

### बीडच्या पाणी पुरवठ्या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट सीओंना दिल्या फोन वरून सूचना

# तत्काळ कमी दाबाने पाणीपुरवठा केला सुरू

## तीनही जिल्हाप्रमुखांनी काडीवडगावला भेट देत निदर्शनास आणून दिला बीडचा पाणीप्रश्न

बीड । प्रतिनिधी

ऐन उन्हाळ्यात बीडकरांना पंधरा दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. मात्र बीड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काडीवडगाव येथील प्लॉटचे काम महिनाभरापासून नागरिकांना पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी आज मंगळवारी (दि.६) काडीवडगाव येथील प्लॉटची पाहणी केली. यावेळी तिनही जिल्हाप्रमुखांनी शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फोन करुन बीडच्या पाणीप्रश्नाचे गांभिर्य निदर्शनास आणून दिले. यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी युध्दपातळीवर काम करुन बीडचा पाणीपुरवठा सुरळीत करा असे आदेश सीओ नीता अंधारे यांना दिले.



बीडकरांना कायमच पाणी प्रश्न भेडसावत आहे. शहरातील काही भागात १५ ते २० दिवसांआड पाणीपुरवठा होतो. काडीवडगाव ते बीड पाईपलाईनच्या दुरुस्तीचे सध्या सुरू आहे. यामुळे बीडकरांना महिनाभरापासून पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी काडीवडगाव प्लान्टच्या कामाची पाहणी केली. यावेळी सीओ नीता अंधारे उपस्थित होत्या. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य पाईपलाईनच्या चार पैकी तीन लिकेजचे काम पूर्ण झाले आहे. यामुळे आज कमी दाबाने शहराला पाणीपुरवठा करण्यात आला. लवकरच चौथ्याही लिकेजचे काम पूर्ण होऊन दोन दिवसानंतर पूर्ण क्षमतेने बीड शहराला पूर्वीप्रमाणे पाणीपुरवठा होईल असे सीओ नीता अंधारे, महाराष्ट्र ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान बीडचा गंभिर पाणीप्रश्न तिनही जिल्हाप्रमुखांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिला. महिनाभरापासून बीडकरांचे कशा पध्दतीने हाल होत आहेत असे त्यांनी एकनाथ शिंदे यांना फोन करुन सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आणि सीओ नीता अंधारे यांचे फोनवर बोलणे करुन देत युद्ध पातळीवर काम करून बीड शहराला पाणीपुरवठा तात्काळ सुरू करा असे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सीओ अंधारे यांना दिले.

**तीनही जिल्हाप्रमुखांनी निदर्शनास आणून दिला बीडचा पाणीप्रश्न**

काडीवडगाव ते बीड दरम्यान असलेल्या बीड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य पाईपलाईच्या दुरुस्तीचे काम सुरू असल्याने शहराचा पाणीपुरवठा गेल्या महिनाभरपासून बंद आहे. यामुळे बीडकरांना टँकरने पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. दरम्यान शिवसेनेच्या तिनही जिल्हाप्रमुखांनी आज काडीवडगाव येथे भेट देऊन कामाची माहिती घेतली. यावेळी त्यांनी शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी फोनवर संपर्क करुन बीडच्या पाणीपुरवठ्याचा गंभीर प्रश्न शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिला. शिंदे यांनीही सीओ व महाराष्ट्र ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांशी फोनवर संवाद साधून पाणीपुरवठ्याच्या कामाची इत्यंभूत माहिती घेतली. तीनही जिल्हाप्रमुखांनी बीडचा पाणीप्रश्न निदर्शनास आणून दिल्याने उपमुख्यमंत्री शिंदेंनीही त्यांची तात्काळ दखल घेतली.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT